प्रेस नोट  दिनांक - ०७.०४.२०२०

**संचारबंदीचे कालावधीमध्ये सोनुर्ली येथे जुगार खेळणाऱ्या ११ इसमांवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचेकडून छापा टाकून १ लाख ९९ रुपये किंमतिचा मुद्देमाल जप्त.**

---

सद्या जगात कोरोना विषाणू (कोव्हीड -१९ ) या जागतिक महामारीचा रोग पसरलेला आहे. सदर रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता भारत सरकारने संचारबंदी जाहीर केलेली आहे. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्हयात संचारबंदी लागु आहे. असे असताना देखील काही इसम सावंतवाडी तालुक्यातील मौजे सोनुर्ली पक्याचीवाडी या ठिकाणी संचारबंदीचे आदेशाचे उल्लंघन करुन एकत्र जमुन अंदर बाहर नांवाचा पत्याचे जुगाराचा खेळ खेळत असल्याबाबत तक्रार पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग या ठिकाणी प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम यांनी सदर इसमांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्गचे पोलीस निरीक्षक श्री सुनिल धनावडे यांना सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांनी अंदर बाहर पत्याचा जुगाराचा खेळ खेळणाऱ्या इसमांबाबत माहीती काढून दि. ०६.०४.२०२० रोजी मौजे सोनुर्ली पक्याचीवाडी ता सावंतवाडी येथील एका आंब्याचे बागेत छापा टाकून ११ आरोपीत हे अंदर बाहर या पत्याचा जुगार खेळ खेळताना मिळून आले. त्यांचे ताब्यातुन जुगाराची साहीत्य, रोख रक्कम, व पाच मोटर सायकल असा एकूण **१ लाख ९९ हजार रुपयाचा मुद्देमाल** जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीत यांचे विरुद्ध सावंतवाडी पोलीस ठाण्यात जुगार प्रतिबंधक कायदयाखाली तसेच संचारबंदी आदेशाची उल्लंघन केलेबाबत गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री दिक्षीत गेडाम, मा. उप विभागिय पोलीस अधिकारी, सावंतवाडी श्री शिवाजी मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्गचे पोलीस निरीक्षक श्री. सुनिल धनावडे, पोलीस उप निरीक्षक सचिन शेळके, पोलीस कर्मचारी सुधीर सावंत, आशिष गंगावणे, अनिल धुरी, प्रवीण वालावलकर, चंद्रकांत पालकर, ज्ञानेश्वर कांदळगांवकर, जयेश सरमळकर तसेच सावंतवाडी पोलीस ठाण्याचे सपोफौ/ लोहकरे यांनी केलेली आहे.

मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग
यांचे मान्यतेने.

पोलीस निरीक्षक,
स्थागुशा, सिंधुदुर्ग